वर्ष १० वे विषेश अंक R.N.I.N.MAHMAR/2013/51443-L/175/RNP/Beed/2022-24 संपादक-अबुबकर खमर पाशा मो.९५४५३८१२२० वार- बुधवार दि.१५ ऑक्टोबर २०२५ पाने ४ किंमत ३

# बीडच्या जेलमध्ये कोणत्या कैद्याला जेलर पेट्रस गायकवाड यांच्यामुळे त्रास होत होता? याची चौकशी करणे गरजेचे

## जशी बीडच्या माजी जिल्हा शल्यचिकित्सक सुरेश साबळे यांना निलंबन करण्याची सुपारी घेतली होती तशीच सुपारी जेलरला बदली करण्याची त्या महाठगांनी घेतल्याची जोरदार चर्चा

## खरोखरच बीडच्या जेलमध्ये धर्मांतरणाचे काम होत होते का? की कोणाला तरी वाचविण्यासाठी किंवा कोणाचे तरी कोणा सोबत तरी बोलणे होत नाही म्हणून....

# कालचा जनआक्रोश मोर्चाची सभा म्हणजे नुसती ठाय...ठाय... बीडमधील हिंदू बांधवांनी त्याकडे डोकूनही पाहिले नाही

## काही ठग्यांचे मराठा आरक्षण आंदोलन थांबविण्याचो हे षडयंत्र तर नाही ना?

### मराठा आरक्षणासाठी मराठा समाजाला मुस्लिम समाजानी भरपुर मदत केली, मुंबई याचे मोठे उदाहरण

### बीड पोलिसांनी त्या सभेत वायफळ बडबड करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करण्याची गरज

### बीडच्या कोणत्याही शैक्षणिक संस्थेत मुलींची छेड होत नाही,तशी एकही तक्रार चारही पोलीस ठाण्यात नाही

बीड, (दिव्य न्युज):- बीड शहरातील सिद्धिविनायक कॉम्प्लेक्स येथे मंगळवारी सायंकाळी हिंदू जनआक्रोश मोर्चा या नावाने सभा आयोजित करण्यात आली होती. सभेच्या पोर्शभूमीवर आयोजकांनी लव्ह जिहाद, धर्मांतर, गोहत्या, लँड जिहाद अशा भडक घोषणा दिल्या. पोस्टरवरही उत्तेजक मजकूर झळकत होता. या भाषणांतून समाजात तणाव निर्माण होईल अशी भीती व्यक्त होत असतानाच, सामान्य बीडकरांनी अत्यंत संयमाने आणि शहाणपणाने प्रतिसाद दिला, हे बीडकरांच्या परिपक्वतेचे द्योतक ठरले. अजित पवारांनी थांबवला भडकावणारा सूर सभेत राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार संग्राम जगताप यांची उपस्थिति अपेक्षित होती. मात्र, कार्यक्रमाच्या काही तास आधीच उपमुख्यमंत्री अजित पवार



यांनी त्यांना मुंबईला तातडीने बोलावल्याची माहिती समोर आली. कारण सभेत होऊ घातलेल्या भडक भाषणांविषयी मुस्लिम समाजाकडून मोठा विरोध वाढत होता. त्यामुळे परिस्थिती अधिक ताणू न देता त्यांनी संयमाने पाऊल उचलले. फेसबुकवर बीडकरांचा शहाणपणाचा सूर सभेचे थेट प्रक्षेपण फेसबुकवरून करण्यात आले. मात्र त्या व्हिडिओखाली आलेल्या स्थानिक नागरिकांच्या प्रतिक्रिया या सभेपेक्षा जास्त चर्चेचा विषय बनल्या. बापूसाहेब शिंदे पाटील यांनी लिहिले गोरक्षकांना गाई सांभाळायला बोलवा, चारापाणी करायला सांगा! शेतकरी गाई विकतो तेव्हा त्याला दोष कशाला? रमेशर खमकर यांनी उपहासात्मक भाषेत म्हटले. शेतकऱ्यांना ▶▶ पान २ वर

# भडक भाषणांनी बीड पेटले नाही, उलट एकतेचा झेंडा फडकला

## कालची सभा ही फक्त आणि फक्त हिंदू मुस्लिम समाजातील काही टवाळखोरांचे माथा भडकविण्यासाठीच

## बीड कारागृह अधीक्षकाची डिमोशन करत तडकाफडकी बदली, पडळकरांनीही केले होते गंभीर आरोप



बीड , (दिव्य न्युज):- महाराष्ट्राच्या कारागृह प्रशासनातून एक महत्त्वाची बातमी समोर आली आहे. बीड कारागृहाचे अधीक्षक पेट्रस गायकवाड यांची डिमोशन करत तातडीने बदली करण्यात आली आहे. अधीक्षक पदावरून त्यांची नागपूर कारागृहात उपाधीक्षक पदावर नियुक्ती करण्यात आली आहे. या कारवाईमागे त्यांच्यावर असलेले गंभीर आरोप कारणीभूत ठरले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, पेट्रस गायकवाड यांच्यावर बीड कारागृहात कैद्यांचे धर्मांतर करण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप आहे. या आरोपामुळे कारागृह प्रशासनामध्ये गंभीर चर्चा सुरू झाली होती. याव्यतिरिक्त, पडळकरांनीही पेट्रस गायकवाड यांच्यावर अनेक गंभीर स्वरूपाचे आरोप केले होते, ज्यामुळे त्यांच्याभोवतीच्या अडचणी वाढल्या होत्या. या सर्व गंभीर पार्श्वभूमीवर प्रशासनाने कठोर पाऊल उचलत त्यांची डिमोशन आणि बदली करण्याचा निर्णय घेतला आहे. महाराष्ट्राच्या राजकारणात आणि प्रशासकीय वर्तुळात या घटनेची सध्या जोरदार चर्चा सुरू आहे.

# बेपत्ता तरुणाचा मृतदेह पालीच्या तलावात आढळला

## मयत दोन दिवसांपासून गायब होता

बीड , (दिव्य न्युज):- घरातून निघून गेलेल्या एका २८ वर्षीय तरुणाचा मृतदेह आज सकाळी पालीच्या तलावात आढळून आला आहे. सदरील या घटनेची माहिती पोलिसांना झाल्यानंतर पोलिसांनी घटनास्थळी जावून मृतदेह शवविच्छेदनासाठी जिल्हा रुग्णालयात आणले आहे. या तरुणाने आत्महत्या केली का काय? असा प्रश्न उपस्थित होत आहे.

पठार शहेबाज खान सलीम खान (वय २८ वर्षे, रा. मोमीनपुरा बीड) ▶▶ पान २ वर

# ढाका खुन प्रकरणातील चौथा आरोपी जेरबंद

बीड, (दिव्य न्युज):- शहरातील माने कॉम्प्लेक्स परिसरामध्ये काही दिवसापुर्वी यश देवेंद्रसिंह ढाका या तरूणाचा खून करण्यात आला होता. या प्रकरणात आरोपी विरोधात गुन्हे दाखल झाले होते. यातील निखील घोडके नावाचा आरोपी फरार होता. या फरार आरोपीला रात्री १२ वाजता पोलिसांनी जेरबंद केले आहे.

२५ सप्टेंबर रोजी रात्री ८.३० च्या सुमारास यश देवेंद्रसिंह ढाका या तरूणाचा माने कॉम्प्लेक्सपरिसरामध्ये खून करण्यात आला होता. या प्रकरणी पाच जणांविरोधात गुन्हा दाखल



करण्यात आला होता. यातील निखिल घोडके हा फरार होता. त्याचा पोलीस शोध घेत होते. रात्री १२ वाजण्याच्या दरम्यान घोडका राजुरी येथून डीवायएसपी पुजा पवार व त्यांच्या टिमने त्यास ताब्यात घेतले आहे.

# ॲड. चंद्रकांत नवले यांची गेवराईच्या शिवसेना जिल्हाप्रमुख पदी नियुक्ती





बीड , (दिव्य न्युज):- आज शिवसेना पक्षाचे मुख्य नेते उपमुख्यमंत्री मा.ना. श्री. एकनाथरावजी शिंदे साहेब यांच्या आदेशानुसार आणि शिवसेना नेते मा. खा. डॉ. श्री. श्रीकांतजी शिंदे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली ड. चंद्रकांत नवले यांची गेवराई कार्यक्षेत्रासाठी शिवसेना जिल्हाप्रमुख म्हणून नेमणूक करण्यात आली. ड.चंद्रकांत नवले हे मूळचे शिवसैनिक असून त्यांना पक्ष संघटनेचा मोठा अनुभव आहे. त्यांनी हिंदुत्वाचा विचार आणि हिंदूहृदय सम्राट स्व. बाळासाहेब ठाकरे यांचे विचार घराघरात पोहोचविण्यासाठी सिव्हिल इंजीनियर पदाचा राजीनामा देऊन महाविद्यालयीन सवंगड्यांना सोबत घेऊन स्वतः सामना या वृत्तपत्राचे शहरात तसेच खेड्यापाड्यापर्यंत वाटप केले तद्नंतर माजी मंत्री प्रा. सुरेश (आण्णा) नवले यांच्या कुशल अशा मार्गदर्शनाखाली त्यांनी १९९५-१९९९ कार्यकाळात शिवसेना जिल्हाप्रमुख म्हणून काम करताना शिवसेना पक्ष फक्त शहरापुरता मर्यादित न ठेवता बीड जिल्ह्यातील प्रत्येक गाव, वाडी, तांडा, वस्ती व पाड्यापर्यंत पोहोचून व शिवसेनेच्या शाखा स्थापन करून आणि संघटनेतील ▶▶ पान २ वर

# एका दिवसाच्या बाळावर हृदय शस्त्रक्रिया

## जिल्हा रूग्णालयाच्या इतिहासात पहिल्यांदाच घडलं; गुंतागुंतीची प्रसूती, जुळ्यांना जन्म अन् तिघेही सुखरूप; मुंबईला घेवून जातांना पाच वेळा बदलावी लागली ॲम्ब्युलन्स

### सव्हीलच्या टिमची ऐतिहासिक कामगिरी महसुल विभागाने काही तासात दिले कागदपत्रं

बीड , (दिव्य न्युज):- जिल्हा रूग्णालयात जाऊन उपचार घेण्यास अनेकांचे मन धजावत नाही. साधं इंजेक्शन घ्यायचं झालं तरी आपण तेथील व्यवस्थेवर अविश्वास दाखवतोत आणि तशी मानसिकता देखील अनेकांची झालेली आहे. मात्र अशा परिस्थितीतही बीड येथील मोमीन मुन्नवर यांनी जिल्हा रूग्णालयाचे शल्यचिकित्सक डॉ.संजय राऊत, बालरोगतज्ञ तथा एनआयसीयु विभागाचे प्रमुख डॉ.इलियास खान आणि त्यांच्या टीमवर विश्वास ▶▶ पान २ वर



# राज ठाकरे कडाडले, जयंत पाटलांनी पुरावे दाखवले 'निवडणूक आयोग राजा हरिश्चंद्र नाही ?

## उद्धव म्हणाले मतदार याद्यात घोळ, निवडणूक रद्द करा राज्यातले सर्वच विरोधी पक्ष आक्रमक निवडणूक आयोगाच्या बैठकीत केली मागणी

मुंबई (दिव्य न्युज):- आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीच्या आधीच राज्यातील विरोधी पक्षांनी निवडणूक आयोगाविरोधात वज्रमूठ उगारत आयोगावर प्रश्नांची सरबत्ती केली. आयोगाला विरोधकांच्या प्रश्नांवर उत्तर देता आले नाही. महाविकास आघाडीतील ठाकरेंची शिवसेना, शरद पवारांची राष्ट्रवादी, काँग्रेस आणि मनसेच्या प्रमुख नेत्यांनी राज्य निवडणूक आयुक्त यांच्याबरोबर आज बैठक झाली. या बैठकीत राज ठाकरेंनी 'तुम्ही सत्तेतील तीन पक्षांसाठी काम करत नाहीत', असं सुनावत 'मतदार यादीमध्ये घोळ असेल तर तुम्ही सर्वोच्च न्यायालयात याबाबत सांगा, की आम्ही निवडणूक घेण्यास तयार नाही, निवडणूक याद्या आम्हाला द्या, आम्ही शहानिशा करू, मतदार यादीतील घोळामुळे निवडणूक कार्यक्रम रद्द करा,' अशी मागणी या वेळी करण्यात आली. राज ठाकरे ज्याप्रमाणे कडाडले त्याप्रमाणे जयंत पाटलांनी निवडणूक आयोगाला काही पुरावे दाखवले, उद्धव ठाकरेंनी तर सत्य स्विकारा आणि निवडणूक रद्द करा, असे म्हणत निवडणूक आयोग हा काही राजा हरिश्चंद्र नाही, असे म्हटले.

राज्य निवडणूक आयुक्तांसोबत आज विरोधकांची महत्वपूर्ण बैठक झाली. या बैठकीला उद्धव ठाकरे, राज ठाकरे, जयंत पाटील, जितेंद्र आव्हाड, शेकापचे जयंत पाटील, बाळासाहेब थोरात, विजय वडेट्टीवार, रईस शेख, अनिल परब, अनिल देसाई, अजित नवले यांच्यासह आदी नेते उपस्थित होते. निवडणूक आयोग हे सत्तेतील तीन पक्षांसाठी काम करत असल्याचा यावेळी आरोप करण्यात आला. राज ठाकरेंनी आक्रमक होत सर्व राजकीय पक्षांचं एकमत होत नाही तोपर्यंत निवडणूक घेऊ नका. तुम्ही महाराष्ट्रात सत्तेत असणार्या तीन पक्षांसाठॅ काम करत नाही. मतदार यादीत घोळ असेल तर तुम्ही सुप्रीम कोर्टाला सांगा. आम्हाला मतदार




याद्या द्या, आम्हीही शहानिशा करून. काँग्रेस बाळासाहेब थोरात ८ टर्म ८०-९० हजार मतांनी निवडणूक जिंकतात, यंदा लाखाने पडले, हे कसे शक्य आहे, असा सवालही त्यांनी केला.

**आम्ही नेमकं कुणाशी बोलायचं : उद्धव ठाकरे**

मुख्य निवडणूक अधिकारी चोकलिंगम आणि राज्य निवडणूक आयोग म्हणतं ही आमची जबाबदारी नाही मग, आम्ही कोणाशी बोलताचे, असा सवाल यावेळी उद्धव ठाकरे यांनी केला. तुम्ही जबाबदारी घेत नाही, व्हीव्हीपॅट तुम्ही घेत नाही, म्हणजे सर्व पुरावे तुम्ही नष्ट कराल. निवडणूक आयोग हा काही हरिश्चंद्र नाही, असे सुनावत सत्य स्वीकारा आणि निवडणूक रद्द करा, असे मागणी उद्धव ठाकरेंनी केली. मतदार याद्यांमध्येच त्रुटी असतील तर निवडणुका कशाल घेता, डायरेक्ट इलेक्शन फॉर सिलेक्शन करून टाका, असा टोलाही त्यांनी लगावला.

**आम्ही अर्ज केला, जाब विचारलं तर आयोग उत्तर देत नाही : जयंत पाटील**

आम्ही अर्ज केला, जाब विचारलं तर निवडणूक आयोग उत्तर देत नाही, अशी खंत व्यक्त करत यावेळी राष्ट्रवादी शरद पवार गटाचे नेते जयंत पाटील यांनी मतदार यादींमध्ये त्रुटींचे पुरावे निवडणूक आयोगासमोर ठेवले. अंतेश्वर गंगाराम शिंदे हा उदगीरमधील मतदार आहे. त्याचा कोणता ठावठिकाणा नाही. मतदार यादी सकाळी नाव असते आणि बातम्यांवर आले तर ते संध्याकाळी डिलीट कसं होतं, आम्ही सगळे पुरावे दिले, ते तुम्हाला पटत आहेत ना ? या प्रश्नांवर आम्ही मतदार यादी तपासतो, असे निवडणूक आयोगाच्या अधिकार्यांनी सांगितले.

**देवांग दवे कोण आहे, याची माहिती घ्या – वडेट्टीवार**

एका पक्षाला पाहिजे तशी वॉर्ड रचना झाली, असा दावा जितेंद्र आव्हाड यांनी केला. तर मतदार याद्यांमध्ये मल्लयाळममध्ये नावे आहेत, अशी तक्रार शिवसेना ठाकरे गटाचे नेते अनिल परब यांनी केली. तर यावेळी काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार यांनी देवांग दवे कोण आहे, याची माहिती घ्या. हा माणूस भाजपचा आहे, हा निवडणूक आयोगाचा मीडिया हाताळतो, असा आरोप करत मतदार यादीत प्रचंड घोळ असेल तर निवडणूक पारदर्शक कशी होणार ?, असा सवालही वडेट्टीवार यांनी केला.

# एसटी बँकेच्या सभेत राडा !

## सदावर्ते गट आणि शिवसेना कार्यकर्त्यांमध्ये फ्री स्टाईल हाणामारी, वाद पोलीस ठाण्यात

मुंबई, (दिव्य न्युज)ः- एसटी बँकेच्या बैठकीमध्ये सदावर्ते गट आणि शिवसेना शिंदे गटाचे अडसूळ यांच्या कार्यकर्त्यांमध्ये मोठा राडा झाला आहे. या बैठकीच्या दरम्यान दोन्ही गटाचे कार्यकर्ते एकमेकांना भिडले. यामध्ये चार ते पाच संचालक जखमी झाल्याची माहिती आहे. या दोन्ही गटाचा वाद आता नागपाडा पोलीस ठाण्यात पोहोचला असून एकमेकांविरोधात तक्रारी देण्यात आल्या आहेत.

दिवाळीच्या पार्श्वभूमीवर एसटी बँकेची मिटिंग बोलवण्यात आली होती. त्यामध्ये दिवाळी बोनस वाटपाची चर्चा करण्यात आली. याच मुद्द्यावरून सदावर्ते गट आणि अडसूळ गट यांच्यामध्ये मतभेद झाले आणि नंतर त्याचे रुपांतर हाणामारीमध्ये झालं. एसटी बँकेच्या संचालकांच्या बैठकीमध्ये बाहेरुन आलेली माणसे बसवण्यात आल्याचा आरोप अडसूळ गटाकडून करण्यात येत आहे. एसटी बँकेमधील सदावर्ते गट आणि शिवसेनेचा अडसूळ गट यांचा वाद सध्या विकोपाला गेल्याचं दिसतंय. सदावर्ते गटाकडून या बँकेमध्ये मोठा भ्रष्टाचार केल्याचा आरोप अडसूळ गटाकडून करण्यात येत आहे. त्यातूनच आजचा राडा झाल्याचं दिसतंय.या बाबतीत माजी खासदार आनंदराव अडसूळ यांनी प्रतिक्रिया देताना सांगितलं की, या बँकेमध्ये सदावर्तेंनी जो भ्रष्टाचार, गैरव्यवहार केला त्यामुळे कर्मचाऱ्यांना ही बँक सुरक्षित वाटत नाही. या बँकेत १२५ कर्मचाऱ्यांची भरती ही पैसे घेऊन करण्यात आली आहे. या बँकेच्या १२ कोटीच्या सॉफ्टवेअरसाठी सदावर्तेंच्या गटाने ५२ कोटी दिले आहेत. या सगळ्या गोष्टी आता समोर येत असल्याने त्यांचे पित्त खवळले. त्यामुळेच सदावर्तेंनी बाहेरची माणसे बैठकीत आणले आणि त्यांनी हा राडा घातला. सीसीटीव्ही फुटेजमध्ये या सगळ्या गोष्टी दिसत आहेत. या प्रकरणी आम्ही नागपाडा पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे.

एसटी बँकेच्या मिटिंगमध्ये बाहेरून लोक आणले होते आणि संचालकांच्या सोबत बसले होते असा आरोप अडसूळ गटाने केला आहे. तशा प्रकारची तक्रार देण्यात आली आहे.या आगोदर एसटी बँकेच्या इतिहासामध्ये अशा प्रकारची हाणामारीची घटना घडली नाही. एसटी को-ऑपरेटिव्ह बँक ही एसटी कर्मचाऱ्यांच्या घामाच्या पैशावर चालणारी आशिया खंडातील सगळ्यात मोठी को-ऑपरेटिव्ह बँक म्हणून ओळखली जाते. परंतु गेल्या काही दिवसात या बँकेमध्ये मोठ्या प्रमाणावर गैरव्यवहार होत असल्याच्या तक्रारी आहेत. त्यामुळेच या बँकेतून मोठ्या प्रमाणात ठेवीही काढण्यात येत असल्याची माहिती आहे.

पान १ वरून

## अनधिकृत प्रार्थनास्थळाविरुद्ध

भागात काही बांगलादेशी लोक मोठ्या प्रमाणात आले आहेत. त्यांची चौकशी करून पोलीस प्रशासनाने ओळखपत्रे तपासावीत. स्थानिक समाजाची सुरक्षा ही आमची प्राथमिक जबाबदारी आहे. हिंदूंवर अन्याय होत असेल तर आम्ही शांत बसणार नाही. दोषींवर कारवाई न झाल्यास आम्हाला पोलीस ठाण्यासमोर आंदोलन करावे लागेल. जनतेच्या सुखदुःखात सहभागी होण्यासाठी त्यांनी आम्हाला लोकप्रतिनिधी केले आहे. त्यामुळे जर कोणाला जास्त खूमखुमी असेल तर त्यांची खुमखुमी काढायला मी आणि देवा भाऊ पक्का आहे असेही ते म्हणाले.

पोलिस काय करतात?

आरोपी कुठे आहे हे पोलिसांना माहीत असते. पोलिसांनी जर ठरवले तर त्यांना अटक करू शकतात. परंतु पोलीस काय करतात हे कळत नाही. २४ तासाच्या आत आरोपीला अटक केली नाही, तर यापेक्षा जास्त उग्र स्वरूपाचे आंदोलन छेडले जाईल. हिरव्या जातीचे साप फणा काढणारे असतात. अशा फणा काढणाऱ्याला ठेचून मारला पाहिजे. इथून पुढे असे प्रकार घडू नये, यासाठी आदिवासी बांधवांनी आपल्या समाजात जागरूकता निर्माण करणे गरजेचे असल्याचे आमदार संग्राम जगताप यांनी आवाहन केले.

## केजच्या कोरडेवाडी

आपलं पोट भागवण्यासाठी बाहेर जिल्ह्यात जाऊन काम करत आहेत. आणि या गावचा शेतकरी ऊस तोडून कर्ज काढून आपल्या मुलाला बाहेर जिल्ह्यात शिकायला पाठवत आहे. या सगळ्याला कारण फक्त एकच आहे कोरडेवाडीचा साठवण तलाव गेल्या वर्षी धर्मवीर छत्रपती संभाजी राजे शौर्य प्रतिष्ठान यांच्या माध्यमातून राजश्रीताई उंबरे पाटील यांनी कोरडेवाडी या गावात साठवण तलावाच्या प्रश्नासाठी अकरा दिवस बिन अन्न पाण्याचं आमरण उपोषण केलं होतं त्यावेळीस देखील महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस साहेब यांनी उपोषणाच्या अकराव्या दिवशी समस्त कोरडेवाडी गावकरी मंडळी समोर कॉल द्वारे सांगितलं होतं उपोषण स्थगित करा तुमची साठवण तलावाची मागणी मी लवकरच मान्य करत आहे पण आज त्याच गोष्टीला व त्यांच्या आश्वासनाला पूर्ण एक वर्ष झाला आहे तर त्याच अनुषंगाने आज कोरडेवाडी या गावात पुन्हा नव्याने कोरडेवाडी गावकऱ्यांच्या बळावर व धर्मवीर छत्रपती संभाजी राजे शौर्य प्रतिष्ठान संस्थापक अध्यक्ष बाळराजे दादा वारे पाटील यांच्या माध्यमातून आज अकरा दिवस झालं राजश्रीताई उंबरे पाटील यांचा कोरडेवाडी या गावात आजचा उपोषणाचा अकरावा दिवस आहे आणि आज उपोषण ११ दिवस उलटूनही कोणताच प्रतिनिधी व प्रशासनाचा अधिकारी उपोषण स्थळे भेट देण्यात आलेला नाहीये . आत्ताच काही दिवसाखाली केज तालुक्यातील तहसील कार्यालय समोर बैलगाडी मोर्चा घेऊन तहसील कार्यालयासमोर बैलगाडी जाळण्यात आली होती तर त्यावेळेस आठ दिवसानंतर कुठे तहसीलदाराने उपोषण स्थळी भेट दिली व दोन दिवसा खाली कोरडेवाडी या ग्रामस्थांकडून आपल्या साठवण तलावाच्या प्रश्नासाठी जलसमाधी आंदोलन करण्यात आले होते कारण सरकारचं व प्रशासनाचे लक्ष कसं केंद्रित करावं यासाठी हे आंदोलन करण्यात आले होते तरी देखील सरकारला जाग आलेली नाहीये तर त्याच अनुषंगाने उद्या दिनांक १४ १० २०२५ रोजी केज तालुक्यातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात मोठ्या संख्येने रास्ता रोको आंदोलन करण्यात येणार आहे आणि जर का येत्या दोन दिवसांमध्ये या आंदोलनाची व उपोषणाची दखल घेण्यात नाही आली तर सरकारला हे शेतकऱ्याचे आंदोलन मोठे भोवनार. कारण सरकारला आम्ही त्यांच्या तिजोरीतील संपत्ती किंवा त्यांच्या जमिनी नाही मागत आहोत आम्ही आमच्या हक्काचं पाणी मागत आहोत व आम्ही आमच्या मागणीसाठी गेली ३०-३५ वर्ष झाले संघर्ष करत आहोत जर का दोन दिवसांमध्ये आमची दखल घेतली नाही तर या मराठवाड्यामध्ये शेतकरी काय करू शकतो हे नक्कीच मात्र सरकारला दाखवून देईल.असे मत सामाजिक कार्यकर्ते स्वप्निल वरपे पाटील यांनी केले आहे.

पान १ वरून

## बीडच्या जेलमध्ये

घरात गाई पाळा, मग समजेल गाई किती महाग आहेत! त्याच लाईव्हवर त्यांनी आणखी लिहिले -अय एकबोट्यांनो, शेतकऱ्यांना शिकवू नका, आम्हीच गाई सांभाळतो! राहुल मांडवे यांनी टीकेचा सूर लावत म्हटले - फडणवीसांनी शेतकऱ्यांच्या आक्रोशाला झाकण्यासाठी हा मोर्चा काढला आहे. हिंदू-मुस्लिम दंगल घडवण्याचा प्रयत्न सुरू आहे, पण शेतकरी आता जागा झाला आहे. अशा नीच विचारांना आपल्या भागातून हद्दपार करायला हवे! सौ कुंदाताई काळे पाटील -:तरुण पोरांचे डोके भडकणे यालाच हिंदुत्व म्हणाव का.. तरुण पोरांच्या हाताला काम द्या शेतकऱ्याचे प्रश्न सोडवा गोरगरिबांना ,खायला मिळेल का याचा विचार केलाय का.. हिंदुत्व कशाला म्हणतात

थोडेसे,,डोक्याचं भान ठेवा.. महिलांवर होणारे आत्याच्या याचं काय. या फेसबुक पोस्टवरील कॉमेंट्सवरून सध्याच्या राजकीय आणि सामाजिक घडामोडींवर उद्धवलेल्या तीव्र प्रतिक्रियांचे वातावरण दिसून येत आहे. अनेक वापरकर्त्यांनी फेसबुकवर केलेल्या प्रतिक्रियांमध्ये मोठ्या प्रमाणात सरकार, भाजप, जातीवाद, हिंदुत्व, बंद पुकारणे, सामाजिक संघटना आणि धर्म या मुद्द्यांवर संतप्त व टोकाची मते मांडली आहेत.काहींनी थेट राजकीय नेत्यांवर आणि पक्षांवर टीका करत त्यांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. काहींनी जातीय आणि धार्मिक राजकारणावर असंतोष व्यक्त केला आहे. यातील प्रतिक्रियांमधून राजकीय अस्वस्थतेचे आणि जनतेतल्या असंतोषाचे स्पष्टपणे प्रतिबिंब उमटले आहे. काहींनी राजकीय नौटंकी, पक्षांची बाजू घेणे, भाजपवर आरोप, तसेच समाजात धर्माच्या नावावर सुरू असणाऱ्या तणावांवर तिखट भाष्य केले आहे. अनेकांनी 'बंदी घाला', 'यावर अभ्यास करा', 'हे पैसे देऊन बोलतात' अशा तिखट टीकाही नोंदवल्या आहेत. सामान्य जनतेचा संदेश - आम्हाला शांतता हवी, द्वेष नव्हे या सगळ्या प्रतिक्रिया बीडच्या समाजमनाचं खरे प्रतिबिंब दाखवतात. बीडकर हिंदू असो वा मुस्लिम - ते दोघेही एकाच मातीतले, एकाच वेदनेतले आणि एकाच संघर्षाचे वाटेकरी आहेत. कोणीही भडक भाषणे देऊन समाजात वैमनस्य पेरण्याचा प्रयत्न केला तरी, बीडकर धर्मनिरपेक्षतेचा आणि मानवीतेचा झेंडा उंच ठेवतील, असा विशास जनतेने दिला आहे.

## बेपत्ता तरुणाचा मृतदेह

हा तरुण गेल्या दोन दिवसांपासून बेपत्ता होता. त्याचा सर्वत्र शोध घेतला मात्र तो कुठेही आढळून आला नाही.त याचा आज सकाळी पालीच्या तलावात मृतदेह आढळून आला. घटनेची माहिती बीड ग्रामीण पोलिसांना झाल्यानंतर पोलिसांनी घटनास्थळी जावून मृतदेह शवविच्छेदनासाठी जिल्हा रुग्णालयात आणला. या तरुणाने आत्महत्या केली की काय, असा सवाल उपस्थित होत आहे. घटनेचा अधिक तपास पोलीस करत आहेत.

## एका दिवसाच्या

दाखवत आपल्या एक दिवसाच्या बाळाच्या ह्रदयाची शस्त्रक्रिया करण्याची जबाबदारी त्यांच्यावर सोपवली.

दरम्यान जुळ्या मुलींची गुंतागूंतीची प्रसुती यशस्वी केल्यानंतर त्यापैकी एका बाळाच्या ह्रदयविकाराचे आणि नसांच्या अदलाबदलीचे निदान सिव्हीलमधील डॉक्टरांनी केले आणि तातडीने मुंबईतील नारायणा हेल्थ हॉस्पीटलमधील तज्ञ डॉक्टरांशी चर्चा करून बाळाला मुंबईला पाठवले. बीड ते मुंबई तब्बल ५ वेळा ॲम्बुलन्स बदलावी लागली. मात्र सिव्हीलच्या डॉक्टरांनी सातत्याने पाठपुरावा सुरूच ठेवला. अखेर दि.८ ऑक्टोबर रोजी बाळावर यशस्वी ह्रदय शस्त्रक्रिया झाली असून जुळ्या मुलींसह आई देखील सुखरूप असून त्यांना तेथून डिस्चार्ज झाला. जिल्हा रूग्णालयाच्या इतिहासात पहिल्यांदाच अशा स्वरूपाची ते ही एक दिवसाच्या आणि १.८ कि.ग्रॅ.वजनाच्या बाळावर ह्रदय शस्त्रक्रिया झाली आहे. बीड येथील जिल्हा रूग्णालयात दि.६ ऑक्टोबर रोजी महिलेने जुळ्या मुलींना जन्म दिला. आठ महिन्याची गर्भवती असतांनाच सिझर करून प्रसुती करावी लागली. महिलेने दोन जुळ्या मुलींना जन्म दिला. त्यापैकी एक २.३ कि.ग्रॅम तर एक मुलगी १.८ कि.ग्रॅम वजनाची झाली. मात्र १.८ कि.ग्रॅम वजन असलेल्या मुलीच्या ह्रदयात दोन ते तीन छिद्र होते हा आजार झाल्याचे निदान जिल्हा रूग्णालयातील डॉक्टरांनी केले. त्याचबरोबर त्या मुलीच्या ह्रदयातील नसा देखील फिरलेल्या म्हणजेच जागा बदललेल्या आढळून आल्या. त्यामुळे त्या नवजात मुलीस एनआयसीयु कक्षात दाखल करण्यात आले. त्यानंतर काही तासातच तिचे टूडी-ईको करण्यात आले. पॅराडॉईज हॉस्पीटलचे डॉ.सिद्दीक आणि अॅपेक्स हॉस्पीटलचे डॉ.इजहार जावेद यांच्या सल्ल्यानुसार मुलीला मुंबईला दाखल करण्याचे निश्चित करण्यात आले. जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.संजय राऊत यांनी तात्काळ १०८ रूग्णवाहिकेची व्यवस्था केली आणि पुढे इतर जिल्ह्यातील आरोग्य यंत्रणेशी संपर्क करून त्या त्या जिल्ह्याच्या हद्दीवर १०८ रूग्णवाहिका सज्ज ठेवण्याच्या सुचना केल्या. दि.७ ऑक्टोबर रोजी नवजात मुलीला मुंबईला शिफ्ट करण्यात आले. जिल्हा हद्दीची मर्यादा असल्याने बीड ते मुंबईपर्यंत तब्बल ५ ॲम्बुलन्स बदलाव्या लागल्या. ८ ऑक्टोबर रोजी मुलीला मुंबईतील नारायणा हेल्थ हॉस्पीटलमध्ये दाखल करण्यात आले. तेथील विभाग प्रमुख डॉ.सुप्रतिम सेन यांनी फोन वरून डॉ.इलियास खान आणि डॉ.सिद्दीक यांच्याशी चर्चा केली. ह्रदयाची मुख्य शस्त्रक्रिया करून पुढील दुसरी शस्त्रक्रिया बाळाचे वजन वाढल्यानंतर करण्याबाबत डॉक्टरांचे एक मत झाले. त्यानुसार मुलीवर ही ह्रदयाची गुंतागूंतीची शस्त्रक्रिया करण्यात आली. त्यासाठी साधारण १ लाख ६५ हजारांचा खर्च अपेक्षित होता. मात्र योजना आणि हॉस्पीटल एनजीओ मुळे मोमीन यांना १ लाखाची सवलत मिळाली. ७० हजार रूपयांत त्यांच्या बाळाची शस्त्रक्रिया यशस्वी झाली. एक ह्रदय शस्त्रक्रिया झाली असून दुसरी शस्त्रक्रिया दिड महिन्यानंतर करण्यात येणार असल्याचे डॉक्टरांनी सांगितले. मुलीला डिस्चार्ज देण्यात आला असून बाळ सुखरूप आहे. दरम्यान जिल्हा रूग्णालयाच्या इतिहासात पहिल्यांदाच अशा स्वरूपाचे निदान होऊन त्यावरील ह्रदयाची शस्त्रक्रिया करून घेण्यासाठी पाठपुरावा करण्यात आला. अतिगंभीर रूग्ण असल्याने आणि त्यांना कागदपत्रांची आवश्यकता असल्याने महसूल विभागातील नायब तहसीलदार हजारे, जिल्हा रूग्णालयातील जन्म प्रमाणपत्र नोंदणी विभागाने काहीच तासाच ही सर्व कागदपत्रे उपलब्ध करून दिली. त्यामुळे ह्रदयाचा गंभीर आजार असलेल्या एका दिवसाच्या मुलीला जीवदान मिळाले.

सीईओंनी सीएस डॉ.राऊत, बालरोगतज्ञ डॉ.इलियास खान यांचे केले अभिनंदन

बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहेमान यांनी आज दुपारी जिल्हा रूग्णालयाचे शल्यचिकित्सक डॉ.संजय राऊत, बालरोग तज्ञ तथा एनआयसीयु विभागाचे प्रमुख डॉ.इलियास खान आणि टीममधील डॉ.कोटेचा, स्त्री रोग तज्ञ डॉ.फरीदा मॅडम, डॉ.परविन शाफे व इतर सर्वांचे अभिनंदन केले. डॉ.इलियास खान यांनी या शस्त्रक्रियेविषयीची सविस्तर माहिती सीईओ रहेमान यांना दिली. यावेळी मुलीचे वडिल मोमीन मुन्नवर, मुबीन सर हे देखील उपस्थित होते. त्यांनीही जिल्हा रूग्णालयाच्या टीमसह महसुल प्रशासनाचे आभार मानले.

## ॲड. चंद्रकांत नवले यांची

सर्व पदाधिकाऱ्यांना विश्वासात घेऊन शिवसेना पक्षाची जिल्हाभर ताकद निर्माण केली होती.

या आणि अशा सर्व बाबींचा विचार करून शिवसेना पक्षाचे मुख्य नेते आणि महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री मा. ना. श्री. एकनाथरावजी शिंदे साहेब आणि मा.खा.डॉ.श्री. श्रीकांतजी शिंदे साहेब यांनी माझ्यावर जो विश्वास दाखवला तो विश्वास मी सार्थ करून दाखवेन असा संकल्प आणि शब्द ड. चंद्रकांत नवले यांनी बोलताना दिला आहे.यावेळी नियुक्तीपत्र देताना शिवसेना सचिव श्री. संजयजी मोरे, शिवसेना संपर्क नेते आमदार श्री. अर्जुनराव खोतकर, मराठवाडा संपर्क प्रमुख श्री. आनंदजी जाधव, शिवसेना सहसचिव श्री. एकनाथजी शेलार, आमदार दराडे साहेब यांचेसह आदी उपस्थित होते.